जनसंपर्क कक्ष

22 APR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवस्पंदन मॅरेथॉनला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'शिवस्पंदन' क्रीडा महोत्सवांतर्गत मॅरेथॉनला फ्लॅग-ऑफ करून प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड आदी. पाच किलोमीटर अंतराच्या कॅम्पस मॅरेथॉनमध्ये ३५०हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

22 APR 2023

# सहकारी संस्थांचे क्षमतावर्धन आवश्यक

## सतीश मराठेः शिवाजी विद्यापीठात सहकार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. २१ : 'ग्रामीण भागातील नागरिकांचे अर्थकारण बदलल्यास त्यांचा आर्थिकस्तर उंचाविण्याचे काम सहकार क्षेत्रातून होवू शकते. ते लक्षात घेवून सहकार क्षेत्राची पडझड रोखण्यासाठी विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी (सोसायटी) पुढाकार घ्यावा. त्यांनी यादृष्टीने कात टाकावी. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी या ग्रामीण सोसायट्यांचे क्षमतावर्धन अत्यंत आवश्यक आहे', असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन व गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित 'ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका' या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामधील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी विविध कार्यकारी सहकारी संस्थांतील कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी डॉ. राजन पडवळ, परशुराम पाटील, प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्रीकृष्ण महाजन, अरुण काकडे उपस्थित होते.**

### विकास सोसायट्यांचे जाळे देशात विस्तारणार

■ जेथे ग्रामपंचायत तेथे किमान एक सहकारी सोसायटीची स्थापना करून ग्रामीण विकासाला चालना देण्याचे धोरण केंद्र सरकार राबवित आहे. ग्रामीण भागातील कृषी आणि अकृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात वित्तीय पुरवठा व्हावा, यासाठी विकास सोसायट्यांचे जाळे संपूर्ण देशात विस्तारण्यात येणार असल्याचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी मराठे यांनी भारतीय विकास संस्थांची सूक्ष्म आकडेवारी मांडली. केंद्र शासन खेड्यांचा विकास करण्यासाठी विकास संस्थांना भरीव मदत करण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. विकास संस्थांनी ताळेबंदीसाठीची आव्हाने स्वीकारावीत. कर्जाचे आणि ठेवींचे आकडे समसमान ठेवण्याकडे लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

'सहकारी संस्थांच्या सबलीकरणासाठी आणि त्यांना पूरक शैक्षणिक आणि संशोधकीय मार्गदर्शनासाठी विद्यापीठ सदैव तत्पर आहे. गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून एमबीए, वाणिज्य, संगणक शास्त्र या विषयांच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सहकार सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाईल', असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. केदार मारूलकर यांनी आभार मानले. या प्रशिक्षणास शाहूवाडी, पन्हाळा, करवीर तालुक्यातील ९० संस्थांमधील १९० सदस्य उपस्थित होते.

**सहकार भारतीची कार्यकारिणी बैठक कणेरी मठ येथे होणार**


सहकार भारतीची प्रदेश कार्यकारिणीची बैठक कोल्हापुरातील कणेरी मठ येथे ३० एप्रिल आणि १ मेस होणार आहे. त्यासाठी राज्यभरातून सुमारे २५० पदाधिकारी उपस्थित राहतील, असे संजय परमणे यांनी या वेळी सांगितले. एकूण विविध १२ प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. त्यांच्याबाबत कोणता वित्तीय व धोरणात्मक बदल करता येईल, या अनुषंगाने या बैठकीत चर्चा करण्यात येईल.

जनसंपर्क कक्ष
22 APR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी संस्थांचे क्षमतावर्धन आवश्यक : सतीश मराठे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे क्षमतावर्धन अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन व गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका' या विषयावरील एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मराठे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

मराठे यांनी, भारतीय विकास संस्थांची अत्यंत सूक्ष्म आकडेवारी मांडली. केंद्र शासन खेड्यांचा विकास करण्यासाठी, विकास संस्थांना भरीव मदत करण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

यावेळी विशेष अतिथी नेहरू मेमोरियल फेलो डॉक्टर परशुराम पाटील, कोल्हापूरचे विभागीय सहनिबंधक अरुण काकडे, डॉ. मुरुडकर, एस. बी. जाधव, बिपीन मोहिते व नारायण परजणे या तज्ज्ञांनीही विविध विषयांवर मार्गदर्शन केले. बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. या प्रशिक्षणास शाहूवाडी, पन्हाळा व करवीर तालुक्यांतील ९० संस्थांमधील १९० सदस्य उपस्थित होते.

लोकमत

# ज्ञानसाधनेतून व्यक्तिमत्त्व फुलवा : व्ही. एन. शिंदे

कोल्हापूर : खूप वाचा, त्यातील चांगले वेचा, ते मनात साठवा, योग्य वेळी आठवा आणि चिंतन करून कृती करा. या मूलमंत्राच्या आधारे विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व फुलवावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

## तृप्ती गुरव तृतीय

तृप्ती गुरव (खेलो इंडिया - तृतीय), मयूर कांबळे व रोहन खाडे (मनपा कुस्ती), दीपक कागले, फिरोज जामदार, रोहित तोडकर, रितेश पाटील (सर्व मनपा टेनिक्वाईट स्पर्धेत प्रथम). तर आदर्श विद्यार्थी म्हणून मीनल आरेकर, मानसी बावडेकर यांचा गौरव करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण (केएमसी) महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. प्र. प्राचार्य डॉ. ए. व्ही. पौडमल यांनी स्वागत केले. प्रा. व्ही. डी. नाईक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. सुप्रिया माने व प्रा. अंजली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. एस. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. अनिल मुडे, डॉ. आर. एस. पवार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
22 APR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'विवेकानंद'मध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक आदानप्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि इंटरनॅशनल अफेअर्स सेल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑसम अॅब्रॉड-कनेक्ट अॅक्टिव्हिटी उत्साहात पार पडला. सांस्कृतिक आदानप्रदान करण्यासाठी नेपाळ, बांग्लादेश, इथोओपिया, सुदान, अफगाणिस्तान, मंगोलिया या देशांतील शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १३ आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांशी संवाद आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव, शैक्षणिक वाटचाल व काही आव्हाने याबाबत दिलखुलास चर्चा केली. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी आपापल्या देशातील संस्कृतीचे नृत्य, गायन, विविध कलाप्रकाराद्वारे दर्शन घडवले.

प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्व्यक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक डॉ. एस. बी. सादळे होते.

कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. आभार विद्यार्थी रोहित पाटील यांनी मानले, तर सूत्रसंचालन ज्योती कुमावत, अॅन्सी बंडी यांनी केले. यावेळी डॉ. रेवती पाटील, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. सी. बी. पाटील, डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. कैलास पाटील, डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील आदी उपस्थित होते.